अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## सांगोला तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा

सांगोला : हवामान खात्याच्या अंदाजानुसार सांगोला तालुक्यात सायंकाळी साडेसहा ते साडेसात दरम्यान सुमारे तासभर विजेचा कडकडाट, मेघगर्जना आणि गारांसह अवकाळी मुसळधार पाऊस झाला. या अनपेक्षित पावसामुळे रब्बी हंगामातील काढणीला आलेल्या ज्वारी, गहू, हरभरा आदी पिकांचे तसेच आंबा, द्राक्ष, पेरू यांसारख्या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.

तालुक्यातील किडबिसरी, कोळा, जुनोनी, आचकदानी, लोटेवाडी, महूद, सांगोला, मेडशिंगी, डिकसळ, राजुरी, उदनवाडी आदी भागांत कमी-अधिक प्रमाणात अवकाळी पाऊस झाला. विशेषतः किडबिसरी आणि डिकसळ परिसरात गारपीट झाल्याने नुकसानाची तीव्रता अधिक आहे. सध्या ज्वारी, गहू आणि हरभऱ्याची काढणी सुरू असून काढलेली पिके शेतातच पडून आहेत. याशिवाय डाळिंब, आंबा, द्राक्ष, कलिंगड, टरबूज यांसारख्या फळपिकांनाही मोठा फटका बसला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे पिकांची नासधूस झाली असल्याचे किडबिसरी येथील सरपंच शिवाजी घेरडे यांनी सांगितले. दरम्यान, नुकसानग्रस्त भागाची तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



# मिनी मंत्रालयात घासून अन् ठासून 'ओन्ली' बीजेपी !

# बार्शीचे दीपक वैद्य झेडपीचे नवे अध्यक्ष



सोलापूर : झेडपीचे नवे अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांचा सत्कार करताना पालकमंत्री जयकुमार गोरे. याप्रसंगी डावीकडून माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रशांत परिचारक, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, आ. सचिन कल्याणशेट्टी आदी मान्यवर.

## इंद्रजीत पवार उपाध्यक्ष

सोलापूर/प्रतिनिधी

विरोधकांच्या ताब्यातील साम्राज्य खालसा करुन इथली सत्तेची सिंहासनं आपल्या वर्चस्वाखाली घेताना सुसाट सुटलेल्या भाजपने सोलापूर जिल्हा परिषदेत नवा इतिहास घडवला. इथं पहिल्यांदा बहुमताच्या जोरावर निर्निवाद सत्ता आणत अध्यक्षपदावर दीपक वैद्य तर उपाध्यक्षपदी इंद्रजित पवार यांना विराजमान करत 'ये तो भाजप है, नया इतिहास बनाती है, जिल्हा परिषदेत घासून अन् ठासून 'ओन्ली' बीजेपी!'चा नारा घुमवला.

- भाजप है तो मुमकीन है, अवघ्या नववी पास शेतमजूर सुपुत्राचा अध्यक्षपदावर उजळला 'दीप'
- पक्ष निष्ठेला मिळाला न्याय, उपाध्यक्षपदाचे सिंहासन खेचून आणण्यात 'इंद्रा'ची जीत
- सामाजिक संतुलन 'समझोत्या'ची पक्षानं दामटवली एक्स्प्रेस

### या शिलेदारांची होती उपस्थिती...

पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी तसेच माजी आमदार राजेंद्र राऊत, राम सातपुते, प्रशांत परिचारक, राजन पाटील, दीपक साळुंखे, भाजप कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, गटनेत्या रश्मी बागल-कोलते, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांसह नवनिर्वाचित भाजप जिल्हा परिषद सदस्य.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### काही विशेष नोंदी...

**६५ वर्षानंतर बार्शीची सरशी**

दीपक वैद्य यांच्या रुपानं जिल्हा परिषद अध्यक्ष पदाची संधी मिळाली आहे. एक शेतमजूराचा मुलगा राज्यमंत्रीपदाच्या दर्जापर्यंत भाजपने पोचवला. तर गेल्या ३५ वर्षपासून भाजपशी एकनिष्ठ असलेले शहाजी पवार यांचे लहान बंधू इंद्रजित पवार यांना उपाध्यक्ष पदाची भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी संधी दिली.

**उपाध्यक्षपदाचा सस्पेन्स संपला**

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांचे मित्र शहाजी पवार यांचे लहान बंधू इंद्रजित पवार यांची बिनविरोध निवड माणण्यात येत होती. तरीही बालाजी नरोटे, विकास बुळा, नेताजी खंडागळे यांनी अध्यक्ष-उपाध्यक्ष पदासाठी अर्ज नेले होते. मात्र पालकमंत्री आणि आजी माजी आमदार यांच्या मध्यस्थीमुळे अध्यक्ष उपाध्यक्ष पदाची निवडणूक बिनविरोध झाली.

# 'स्वराजंली'मधील घुंगरं कधीच झाली होती अबोल; 'डीजे'च्या दणदणाटाची भूरळ, झिंगण्यातून वाहत होती अब्रू!


### बीडच्या 'विशाल'पार्सलचे 'सेक्स' रॅकेट कारनामे


### बंगालसह राज्यातील विविध ठिकाणच्या डीजे डान्सरांचा रतीब

सोलापूर/प्रतिनिधी

लोककला जींवत ठेवण्याच्या मोडनिंब (ता.माढा) इथल्या संस्कृतीवर घाला घातला तो स्वरांजली कला केंद्राचे जगन्नाथ घाडगे आणि चालक विशाल पवार या दोघांनी. मागच्या चार-पाच महिल्यांपर्यंत या केंद्रात घुंगरांची छमछम ऐकायला येत होती. मात्र बीडचं पार्सल विशाल पवार यानं या केंद्रात 'डीजे'च्या दणदणाटाचा धुडगुस चालू केला.'डीजे'च्या दणदणाटाची भूरळ तरुणाईला पडू लागली. अश्लिल हावभाव, प्रचंड अंग प्रदर्शपन, हिडीस आणि किळवासी नृत्ये, अश्लिल पार्ट्या यांचा माहोल केंद्रात पवार यानं चालू ठेवला होता. डीजेचा दणदणाट, अंगप्रदर्शनात बेभान होऊन नाचणाऱ्या पोरी, ओठाला बिअर आणि दारुचे ग्लास, त्यातूनची झिंगण्याची नशा यातच इथं अक्षरश: आब्रु वाहत होती. लावणी कला जोपासण्याऐवजी, या कला केंद्रात 'माया' कमवण्यासाठी तरुणाईला नासवत त्यांच्या वासनेची आग बुजवण्याची धडपड सुरु होती.

विशेषत्वे, या कला केंद्रात केवळ पश्चिम बंगालमधील नव्हे, तर महाराष्ट्रातील अनेक शहरांमधील मुली आणि महिला होत्या, ज्या सेक्स रॅकेटच्या दलदलीत होत्या, अशी माहिती पोलीस सुत्रांकडून मिळाली आहे.





### थिएटर मालक घाडगे पसार की कारवाईसाठी कोणी लपवलं त्याला?

स्वरांजली संगितबारी थिएटरचा मालक जगन्नाथ घाडगे याच्यावर गुन्हे दाखल झाले असले तरी तो फरार झाला. त्यामुळे या कला केंद्रात जे काही घडत होते, त्या संदर्भातील तपशीलवार माहिती पोलिसांना मिळणं अवघड झालं आहे. खरं तर घाडगे हा खरोखर फरार झाला की त्याला कोणाच्या तरी आश्रयाने लपवण्यात आले, याची चर्चा माढा तालुक्यात आहे. त्याचे भ्रमणध्वनी लागत नाहीत. तो पोलिसांच्या ताब्यात आल्यानंतर अनेक गोष्टी समोर येतील.

### घाडगेंनी पवारला कला केंद्र दिलं होतं चालवायला मात्र पैंशाचा व्यवहार पूर्ण न झाल्यानं करार नव्हता झाला

स्वरांजली कला केंद्राचा मुख्य मालक जगन्नाथ घाडगेंनी हे केंद्र बीडच्या विशाल पवार यास चालवण्यास दिले होते. मात्र ठरलेली रक्कम न दिल्यामुळे घाडगे आणि पवार यांच्यामधील कला केंद्राचा करार पूर्ण झाला नव्हता, अशी माहिती समोर आली आहे.

### स्वागत लॉजचा मालक गायकवाड येणार कारवाईच्या कक्षेत

**आरोपी म्हणून नोंद**

स्वरांजली लोककला केंद्रामधील मुली किंवा महिला यांना चॉईस करुन जवळच्या स्वागत लॉजमध्ये गिऱ्हाईक जायचं. या ठिकाणी बिनधास्तपणे त्यांना प्रॉयव्हसी दिली जायची. स्वरांजली कला केंद्र आणि स्वागत लॉज हे 'जगा आणि जगू द्या' या तत्वाने वागत होते. मिल जुल के असाच काही प्रकार त्यांच्याबाबतीत होता. स्वरांजलीवर छाप टाकला गेला. कारवाई झाली त्यानंतर चौकशीच्या टप्प्यावर स्वागत लॉज हिट लिस्टवर आलं आहे. या लॉजचा मालक औंदूबर गायकवाड यास आरोपी करण्यात आलं आहे. त्यातून तो कारवाईच्या कक्षेत येणार आहे.

### प्रश्नपत्रिका चोरी प्रकरण

## अल्पवयीन मुलगा सापडला

सांगोला/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीचा शेवटचा पेपर बुधवारी १८ मार्च रोजी होता. त्याच्या आदल्या दिवशीच अज्ञात चोरट्यांनी सांगोला विद्यामंदिरमधील क स्टडी रूम मधून भूगोल विषयाच्या ५० प्रश्नपत्रिकाचे दोन पाकिटे चोरून नेल्याची घटना घडली. त्यामुळे खळबळ उडाली होती. पोलिसांसमोर मोठे आव्हान असतानाही सांगोला पोलिसांनी तांत्रिक पुराव्याच्या आधारे व गोपनीय माहितीद्वारे २४ तासात एका अल्पवयीन विधी संघर्ष ग्रस्त बालकास २४ तासात मुद्देमालासह पकडण्यास पोलिसांना यश आले.

याबाबत माहिती अशी की, विद्यामंदिर प्रशालेतील कस्टडी रूममध्ये ठेवलेले इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचे भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिका कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेले. बाबत सांगोला पोलीस ठाण्यात सतरा मार्च २६ रोजी गुन्हा दाखल केला होता. सदर घटनेचे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. सांगोला पोलिसांनी चार शोध पथके तयार करून तपास कामी रवाना केले. सदर पथकाने गोपनीय माहितीच्या व तांत्रिक पुराव्याच्या आधारे अज्ञात आरोपीची गोपनीय माहिती काढली असता सदरचा गुन्हा एका अल्पवयीन विधी संघर्षग्रस्त बालकाने केल्याचे उघड झाले आहे. पालका समक्ष बालकाकडे सविस्तर चौकशी केली असता त्याने गुन्हा केले बाबत कबुली दिली आहे तसेच त्याने गुन्हा करतेवेळी वापरलेले इलेक्ट्रिक कटर, इलेक्ट्रिक मोटर सायकल, चोरीस गेलेले दहावी बोर्ड परीक्षेच्या प्रश्नपत्रिका, व तीन कोऱ्या उत्तर पत्रिका सर्व जप्त करण्यात आलेले आहेत.


विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय जगताप, पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांचे आदेशान्वये सपोनी वाघे, सपोनी मोरे, पोसई पुजारी, पाटील पोलीस हेडकॉन्स्टेबल वाघमोडे, अस्लम काझीसह पोलीस कर्मचारी वजाळे, राजगे, सावंत, प्रमोद गवळी, संतोष देवकर, क्षीरसागर, जाधव, लेंगरे, पाटील, मारुती पांढरे आधी पोलीस कर्मचाऱ्यांनी तपासाची कामगिरी बजावली.

**सोलापूर शहराचे तापमान**

कमाल तापमान ३६.४

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



क्रिकेट प्रेम !

कल्याण 368-72-480

मुंबई 259-60-370

2 8 0

# दीड लाख शेतकऱ्यांची गळचेपी

### ७/१२ उतारे बदलले : राज्यातील सर्वात मोठा कोट्यवधींचा महसूल घोटाळा

मुंबई/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या महसूल विभागात खळबळ उडवून देणारा एक मोठा गैरप्रकार समोर आला आहे. जमिनींचा सर्वात महत्वाचा दस्तऐवज असलेल्या ७/१२ (सातबारा) उताऱ्यात फेरफार करून तब्बल एक ते दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची धक्कादायक कबुली खुद्द सरकारने दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा चुकीचा अर्थ लावून महसूल अधिकाऱ्यांनी हे बेकायदेशीर आदेश पारित केल्याचे उघड झाले आहे.

जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर प्रामुख्याने ७/१२ उताऱ्यावरील लेखनदोष किंवा शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुणे जिल्ह्यात काही महसूल अधिकाऱ्यांनी या कलमाचा गैरवापर करून जमिनीच्या मालकी हक्कांतच परस्पर बदल केले. जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. आमदार अनिल परब यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष वेधल्यानंतर महसूल विभागात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती. विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात महसूल प्रशासनातील भोंगळ कारभाराचे वाभाडे काढण्यात आले आहेत. अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसतानाही ७/१२ मध्ये बदल करण्यात आले. नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करून खाजगी हितसंबंध जपले गेले. जमिनी बिगरशेती करताना आणि मालकी हस्तांतरित करताना गंभीर अनियमितता आढळली. आमदार अनिल परब यांनी या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार आणि सहभागी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार, आता या घोटाळ्यातील दोषी तहसीलदारांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत कोणावर कारवाई होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मात्र अधिवेशन संपायच्या आत दोषींवर कारवाई करू असे आश्वासन बावनकुळे यांनी सभागृहात दिले.

**बावनकुळेंची कबुली**



या प्रकरणावर विधान परिषदेत वादळी चर्चा झाली. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासकीय स्तरावर झालेल्या या मोठ्या चुकीची कबुली दिली. ''शुद्धलेखनात बदल करण्याच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही बाब गंभीर आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो,'' असे विधान त्यांनी सभागृहात केले. सुमारे १ ते १.५ लाख शेतकरी या प्रक्रियेत भरडले गेल्याचेही त्यांनी मान्य केले.

**स्व. नागेश (आण्णा) करजगी यांना २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन !**

ज्योत अनंतात विलीन झाली,
स्मृती आठवणींना
दाटून आली..
भाव सुमनांची ओंजळ भरुनी!
वाहतो आम्ही भावपूर्ण
आदरांजली..

स्व. नागेश अण्णा
यांना २१ व्या पुण्यस्मरणानिमित्त
विनम्र अभिवादन!



कै.नागेश (आण्णा) करजगी

अभिवादक

नागेश करजगी ऑर्किड स्कूल
सोलापूर